GMR

## GMR Warora Energy Limited

# व्यावसायिक व आरोग्य सुरक्षा नीति

जी एम आर वरोरा एनर्जी लिमिटेड संपुर्णपणे विश्वास करते कि व्यावसायिक क्षेत्रात होणारे आजार, अपघात, अस्विकार्य सुरक्षेचे उल्लंघन आणि पर्यावरण क्षेत्रातील होणाऱ्या घटना या प्रतिबंधात्मक असुन त्या टाळण्यायोग्य आहेत. आम्ही आमचे शुन्य अपघात, हानी हे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रतिबद्ध आहोत. व्यावसायिक क्षेत्रात स्वास्थ्य व सुरक्षा करित नेतृत्वाची सक्रिय भुमिका हि व्यावसायिक क्षेत्रात सुदृढ व चांगले आरोग्य, सुरक्षा उपलब्ध करुन देण्यास कटिबद्ध आहे. आमचे कर्मचारी, सहयोगी संस्था, त्यांचे कर्मचारी कामगार, ठेकेदार, अभ्यागत तसेच भागधारक आणि जे सर्व कंपनीच्या दैनंदिन कामामुळे प्रभावित होऊ शकतात अश्या सर्वांचे दुखापत, आजारपण, अपघात, घटना या पासुन प्रतिबंध करणे करिता कटिबद्ध आहोत. जी एम आर कंपनी समुहाचे दृष्टीकोन, मिशन, मुल्य, विश्वास लक्षात घेऊन जी डब्ल्यु इ एल व्यावसायिक सुरक्षा आरोग्य, सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली याचा अवलंब करील, ही व्यवस्थापन प्रणाली कार्पोरेट इ एच एस धोरण व जी डब्ल्यु इ एल आइ एम एस धोरणास अनुसरुन असेल. शाश्वत तसेच स्पर्धात्मक व्यावसायिक क्षेत्रात हि सर्व धोरणे योग्य रितीने राबविण्यासाठी आम्ही मदत करण्यास कटिबद्ध आहोत.

हे सर्व उद्दिष्टये साध्य करण्यासाठी जी डब्ल्यु इ एल खालील बाबींची पुर्तता करेल.

- पर्यावरण, आरोग्य सुरक्षा या करिता आवश्यक त्या सर्व स्वीकार्य कायदेशीर तसेच गरज असलेली, तरतुदींची पुर्तता करेल.
- शुन्य घटना व अपघात हे उद्दिष्टे पुर्ततेसही आरोग्य व सुरक्षा विभाग पुढाकार घेईल या करिता आवश्यक त्या सर्व साधनांचा वापर करुन सर्व कर्मचारी तसेच भागधारक यांना आजार, अपघात होणार नाही याची काळजी घेईल व या करिता या व्यवस्थापन प्रणाली मध्ये सुचविलेल्या सर्व बाबींचे पालन करण्यास कटिबद्ध आहे.
- स्वयं पुढाकार घेऊन पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा क्षेत्रातील धोके सुधारणांचे शोध घेऊन व त्यावर जोखिम व्यवस्थापन तत्वध्यान पद्धतीचा वापर हे संभाव्य धोके, घटना, अपघात जेथे जेथे होण्याची शक्यता आहे त्याचा समुळ उच्चाटन करणे हे उद्दिष्ट लक्षात ठेऊन या तत्त्वधान प्रणालीचा अवलंब करील.
- पर्यावरण आरोग्य व सुरक्षा संदर्भात कंपनी समुहात नवीन आलेल्या व्यक्तिस प्रशिक्षित करणे, कारखान्यातील संभाव्य धोक्याच्या संदर्भात सूचना, माहीती हि सर्व कर्मचारी, सहयोगी संस्था, ठेकेदार, कर्मचारी यांना पुरविणे व आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे, देखरेख ठेवणे व वेळोवेळी मार्गदर्शन करणे जेणेकरुन औद्योगिक सुरक्षा प्रणालीची संपूर्णपणे अंमलबजावणी होतील याची खात्री करणे.
- व्यावसायिक पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा क्षेत्रात सतत सुधारणा करण्यासाठी व योग्य उद्दिष्टये गाठण्यासाठी व या क्षेत्रातील कामगीरीचे मापदंड उचाविण्यासाठी अल्प कालावधीचे तसेच दिर्घकालीन उद्दिष्टये समोर ठेऊन सर्व भागधारकांना समावेशक योग्य मापन करण्यात येईल. या करिता ठराविक कालावयित केलेल्या कार्याचे पुनर्वलोकन करण्यात येईल.
- व्यावसाविक पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा क्षेत्रात व्यवस्थापन प्रणालिचे ठराविक कालावधित अंमलबजावणी होण्यासाठी योग्य नियोजन तसेच मनुष्यबळ, संसाधने, यंत्रसामग्री, पैसे व योग्य पद्धत या गोष्टीचा पुरवठा करण्यात येईल.
- कर्मचारी व सहयोगी संस्था यांच्या समवेत कार्य करित संस्थागत रचना, कामाचे योग्य वाटप, दायित्व तसेच उत्तरदायित्व व प्रत्येक स्तरावरील दायित्व प्राधिकृत करणे व तसे उदाहरण प्रस्थापित करणे.
- सुरक्षा समित्या स्थापन करुन कर्मचारी सहभाग वाढविणे, वेळोवेळी प्रोत्साहन कार्यक्रम राबविणे व इ एच एस प्रणालिचे व्यवस्थापन करणे तसेच वेळोवेळी याचे पुनरावलोकन करणे.
- व्यावसायिक क्षेत्रातील चांगल्या पद्धतीचा अवलंब करुन तसेच अदंडनिय पद्धत स्विकारुन सुरक्षा संस्कृती आचरण वाढविण्याचा प्रयत्न असेल या करिता प्रत्येक घटनेचे, दुर्घटनेचे किंवा संभाव्य धोके आढळल्यास त्याची तपशिलवार माहिती देणे, तपास करणे व ते टाळण्यासाठी योग्य सुधारणा मार्गदर्शक प्रणाली, प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे व वेळोवेळी त्याचे पुनरावलोकन करणे.
- ठराविक कालावधीत लेखापरिक्षण करणे व इ एव एस प्रणालीचे वेळोवेळी पुनरुत्थान करणे.
- इ एच एस प्रणालीचे अंमलबजावणीसाठी प्रत्येक क्षेत्रात जसे यंत्रसामुग्री खरेदी, साहित्य खरेदी, उपकरणे व साहित्य खरेदी किंवा मनुष्यबळ घेतांना या प्रणालीचा वापर करणे.
- मनुष्यबळाचे व्यावसायिक क्षेत्रातील त्याचे योगदान तसेच सफलता लक्षात घेतांना व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा प्रणालीचे मापदंड लाउन त्याचे आकलन करणे.
- व्यवस्थापनाचा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य क्षेत्रातील हेतू लक्षात घेउन सातत्याने वा क्षेत्रातील सुधारणा व कर्मचारी यांचा सहभाग वाढविणे या करिता सर्व कर्मचारी या प्रणालीचे पालन करतो व तचे अंमलबजावणी करतो याचा अहवाल व्यवस्थापनास सादर करणे.
- औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाच्या कामगिरीचा सविस्तर वार्षिक अहवाल व सातत्य अहवाल सादर करणे.
- या व्यवस्थापन प्रणालीचे ठळक व प्रमुख ठिकाणी प्रदर्शन करणे.
- या व्यवस्थापन प्रणालीचे सर्व कर्मचारी, सहयोगी संस्था, व बाहेरिल भागधारक, संस्था यांना उपलब्ध करुन देणे.
- या व्यवस्थापन प्रणालीचे दर तीन वर्षांनी पुनरावलोकन करणे व योग्य त्या सुधारणा करणे.

या औद्योगिक सुरक्षा व आरोग्य प्रणालीचे सर्व जी डब्ल्यु इ एत कर्मचारी, सहयोगी संस्था, त्यांचे कर्मचारी यांनी पालन करावे तसेच सुरक्षा प्रणालीतील चांगल्या पद्धतीचा अवलंब करावा, तसेच सुरक्षा संस्कृतीचा अंगिकार होण्यासाठी सर्वांचे सहकार्य व आपल्या सुरक्षा पती कर्तव्याचे पालन करण्याचे आवाहन मी करित आहे.

1 ऑगस्ट 2018
Revision: 01

Dzeshpande

धनंजय देशपांडे
सी ओ ओ (ऑक्युपायर)